स्थापना : 1942

RBI Lic.-UBDKA 776 P Dt. 18-12-1986

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव

MARATHA CO-OPERATIVE BANK LTD., BELGAUM

1477, बसवाण गल्ली, बेळगांव – 590 002



2022-23 81 वा वार्षिक अहवाल

2022-23

ऑडीट वर्ग 'अ'

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव
MARATHA CO-OPERATIVE BANK LTD., BELGAUM

* संचालक मंडळ *

श्री. दिगंबर श्री. पवार
चेअरमन

सौ. निना सु. काकतकर
व्हा. चेअरमन

श्री. बाळाराम बा. पाटील

श्री. दीपक दळवी

श्री. बाळासाहेब शि. काकतकर

श्री. लक्ष्मणराव स. होनगेकर

श्री. बाबुराव सा. पाटील

श्री. विश्वनाथ (शेखर) प. हंडे

श्री. विनोद सदाशिवराव हंगिरकर

श्री. मोहन प्रकाश चौगुले

श्री. सुशिलकुमार शि. खोकाटे

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव
MARATHA CO-OPERATIVE BANK LTD., BELGAUM

सौ. रेणू सुहास किल्लेकर

श्री. सुनिल म. अष्टेकर

श्री. लक्ष्मण शिवाजी नाईक

श्री. बाळासाहेब शि. काकतकर
चेअरमन

व्यवस्थापन मंडळ
BOARD OF MANAGEMENT

श्री. सुशिलकुमार शि. खोकाटे

श्री. बी. बी. खंडागळे
बँकिग तज्ञ

सौ. नयन मिरजकर
सी.ए.

श्री. जयराज मोदगेकर
कायदे सल्लागार

श्री. संतोष एम. धामणेकर
जनरल मॅनेजर

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव
MARATHA CO-OPERATIVE BANK LTD., BELGAUM

रिझर्व्ह बँकेच्या जनरल मॅनेजर मिनाक्षी गड– बँकेला सदिच्छा भेट प्रसंगी सत्कार करताना चेअरमन श्री. दिगंबर पवार, व्हा.चेअरमन सौ. निना काकतकर बाजुला संचालक श्री. बाळासाहेब काकतकर, संचालिका सौ. रेणू किल्लेकर व इतर.

महाराष्ट्र राज्य मंत्री व कोल्हापूर जिल्हा पालकमंत्री श्री दीपक केसरकर – बँकेला सदिच्छा भेट प्रसंगी सत्कार करताना बँकेचे चेअरमन श्री. दिगंबर पवार, व्हा. चेअरमन सौ. निना काकतकर व इतर संचालक.

श्री. अतुल खिरवाडकर CEO NUCFDC Ltd Delhi व CA श्री धनंजय गोखले बँकेला सदिच्छा भेट प्रसंगी सत्कार करताना बँकेचे जेष्ठ संचालक श्री. बाळाराम पाटील, बाजुला चेअरमन श्री. दिगंबर पवार, व्हा. चेअरमन सौ. निना काकतकर व इतर संचालक.

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव

1477, बसवाण गल्ली, बेळगांव – 590 002

website : www.marathacooperativebank.com

स्थापना : 1942

नोंदणी क्रमांक : 8384 ता. 5-11-1942

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बँकिंग लायसन्स नं. UBDKA 776P – ता . 18-12-1986

1 हेड ऑफीस : फोन नंबर – 2420535, 2400686, 4200670, 2462342, 2425194

Email : wecare@marathacooperativebank.com

* शाखा *

2	3	4	5	6
मुख्य शाखा	**मार्केट यार्ड**	**खानापूर रोड**	**उद्यमबाग**	**नरगुंदकर भावे चौक**
कामकाजाची वेळ	फोन नं. 2478785	फोन नं. 2429372	फोन नं. 2440514	फोन नं. 4201634
रविवार व सुट्टीचे दिवस खेरीज	कामकाजाची वेळ	कामकाजाची वेळ	कामकाजाची वेळ	कामकाजाची वेळ
10-30 ते 2-30	10-30 ते 2-30	10-30 ते 2-30	10-30 ते 2-30	10-30 ते 2-30
3-15 ते 4-30	3-15 ते 5-00	3-15 ते 5-00	3-15 ते 5-00	3-15 ते 5-00
शनिवार	मंगळवार	शनिवार	शनिवार	शनिवार
10-30 ते 3-00	10-30 ते 3-00	10-30 ते 3-00	10-30 ते 3-00	10-30 ते 3-00

7 **शहापूर शाखा :** फोन नं. 4209982 कामकाजाची वेळ 10-30 ते 2-30, 3-15 ते 5-00, शनिवार 10-30 ते 3-00

ऑफीसची वेळ : सकाळी 10-30 ते 6-00

संचालक मंडळ

श्री दिगंबर श्रीधर पवार
चेअरमन
उद्योजक

सौ. निना सुहास काकतकर
व्हा. चेअरमन
सामाजिक कार्यकर्त्या

1. श्री बाळाराम बाबुराव पाटील
2. श्री. दीपक अर्जुनराव दळवी G. D. (Arch)
3. श्री. बाळासाहेब शिवाजीराव काकतकर
4. श्री. लक्ष्मणराव सतबा होनगेकर B.Sc.
5. श्री. बाबुराव साताप्पा पाटील B.Com
6. श्री. विश्वनाथ (शेखर) परशराम हंडे
7. श्री. विनोद सदाशिवराव हंगिरकर
8. श्री. मोहन प्रकाश चौगुले
9. श्री. सुशिलकुमार शिवबाळ खोकाटे M. Tech
10. सौ. रेणू सुहास किल्लेकर
11. श्री. सुनिल मल्लाप्पा अष्टेकर
12. श्री. लक्ष्मण शिवाजी नाईक

श्री. संतोष एम. धामणेकर – जनरल मॅनेजर

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

('अ' वर्ग सभासदांसाठी)

बँकेची 81 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 10 सप्टेंबर 2023 रोजी सकाळी 11.00 वा. मुख्य शाखा, 1477, बसवाण गल्ली, बेळगांव येथील ''छत्रपती शिवाजी महाराज सभागृह'' येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

* विषय पत्रिका *

1. सभेची नोटीस वाचून दाखविणे.
2. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
3. संचालक मंडळाने तयार केलेला सन 2022-23 चा अहवाल, नफा-तोटा, ताळेबंद पत्रक याचे वाचन करुन मंजुरी देणे.
4. 2022-23 चा ऑडीट रिपोर्ट आणि बँकेने तयार केलेला दोष दुरुस्ती रिपोर्ट याचे वाचन करणे व परिशिलन करणे.
5. सन 2023-24 सालाकरिता स्टॅट्युटरी ऑडीटर यांच्या नेमणुकीची शिफारस रिझर्व्ह बँकेला केली आहे. त्याची माहिती देणे.
6. 2023-24 सालच्या अंदाज पत्रकाचे परिशिलन करणे व मंजुरी देणे आणि 2022-23 सालच्या अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चास अनुमती देणे.
7. निव्वळ लाभाची विभागणी आणि राखीव निधी व इतर निधी निर्माण बाबत मंजुरी घेणे.
8. बँकेचे संचालक आणि त्यांच्या नातेवाईकानी घेतलेल्या कर्जाचे परिशिलन आणि थकबाकी असल्यास घेतलेल्या क्रमाबाबत विचार करणे.
9. बँकेचे सदस्य आणि संचालकानी बँकेची सेवा घेण्याबाबत चर्चा, परिशिलन.
10. नोकर नेमणूक, वेतन, आर्थिक सौलभ्य यांचे परिशिलन आणि आवश्यक क्रम.
11. एक रक्कमी परत फेड योजनेला (OTS) मंजुरी देणे.
12. कर्ज वसुलीचे अधिकार अबाधित राखून केवळ निर्लेखित (टेक्नीकल राईट ऑफ) करण्यास अनुमती देणेबाबत.
13. पोट नियम दुरुस्तीला मंजुरी देणे.
14. सहकारी कायदा 1959 कलम 27 (डी) प्रमाणे राहिलेले इतर विषय.
15. मान. चेअरमनसाहेब यांच्या परवानगीने चर्चिले जाणारे इतर विषय.

बेळगांव.
दि. 20/08/2023

श्री. दिगंबर पवार
चेअरमन

मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव 2022-2023 सालाचा 81 वा

वार्षिक अहवाल

सन्माननिय सभासद बंधू आणि भगिनींनो,
सस्नेह नमस्कार,

मराठा को-ऑपरेटिव्ह बॅक लि. बेळगांव च्या 81 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपणा सर्वांचे मा. संचालक मंडळाच्या वतीने मी मन:पुर्वक स्वागत करतो.

आर्थिक वर्ष 2022-2023 मधील बॅकेच्या कामकाजाचे लेखापरीक्षण झालेले वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक, नफा विभागणी, अंदाज पत्रक व पोट नियम दुरुस्ती इत्यादी बँकेच्या संचालक मंडळाच्यावतीने आपणापुढे मंजुरीसाठी सादर करताना मला आनंद होत आहे.

आपल्या सर्वांच्या सातत्यपूर्ण सहकार्य व पाठींब्यामुळेच आपल्या बँकेने, प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रगतीचा आलेख आणखी उंचीवर नेला आहे. याचा मला अभिमान आहे.

बॅकिंग क्षेत्राचा आढावा -

कोवीड 19 महामारीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मागील दोन वर्षामध्ये झालेला परिणाम आता बराच कमी झालेला असून सर्व अर्थव्यवस्था पुर्वपदावर येत आहे. जागतिक पातळीवर घडणाऱ्या घटनांचे पडसाद देशपातळीवर दिसून येतात. जागतिक अर्थव्यवस्थेमधील व्याजदर बदलाचे संकेत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये उमटले त्याचा परिपाक म्हणून ठेवी व कर्जावरील व्याजदरामध्ये वाढ झाली. अशाही परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्था पुर्वी दहाव्या क्रमांकावर होती ती आत्ता पाचव्या क्रमांकावर आलेली आहे.

सहकारी बँकिंग क्षेत्राचा विचार करावयाचा झाल्यास केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना करुन त्याची जबाबदारी मा. केंद्रीय गृहमंत्री श्री. अमितजी शहा यांच्याकडे देण्यात आली आहे. त्याचा निश्चित फायदा सहकार क्षेत्राला होणार आहे. बँकिंग क्षेत्रात इतर बँकाच्या प्रवेशामुळे आणि नवनवीन तंत्रज्ञानामुळे या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी ग्राहकांना अधिक चांगले पर्याय उपलब्ध करुन देण्याकरिता मोठ्या स्वरुपाचा भांडवली खर्चही करावा लागत आहे. रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकाचे चार पदरी स्ट्रक्चर अमलात आणलेले आहे. तसेच सुपरव्हायजरी ॲक्शन फ्रेम वर्क (SAF) निकषामध्ये, एफ. एस. डब्ल्यू एम. (FSWM) निकषामध्येही बदल करुन कठोर अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. सहकारी बँकाना वाढण्याची संधी व अस्तित्वाची आव्हाने अशी दोन्ही आव्हाने आहेत.

हळू हळू सुधारत असलेली अर्थव्यवस्था जागतिक व देशांतर्गत आर्थिक घडामोडी, आर्थिक क्षेत्रामध्ये वाढती स्पर्धा यामधुनही आपली बँक नव्या प्रणाली स्विकारत आधुनिकतेकडे वाटचाल करीत आहे.

विषय नं - 3. संचालक मंडळाने तयार केलेला सन 2022-23 चा अहवाल, नफा-तोटा, ताळेबंद पत्रक याचे वाचन करुन मंजुरी देणे.

बँकेच्या आर्थिक प्रगतीचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

तपशील		31-03-2021	31-03-2022	31-03-2023
सभासद संख्या		12104	11794	12181
शेअर भांडवल		2,73,88,900	2,70,04,900	2,73,65,700
रिझर्व्ह व इतर फंड		59,24,48,421	62,51,94,480	67,14,86,170
ठेवी		148,96,54,319	161,10,65,918	181,76,89,719
कर्जे		102,30,87,934	116,18,01866	128,04,57,090
गुंतवणूक		105,64,70,756	107,32,42,862	119,51,34,485
नफा		2,55,19,127	2,61,09,604	2,69,81,807
लाभांश	'अ' वर्ग	20%	15%	(Proposed) 15%
	असोशिएट मेंबर्स	6%	8%	(Proposed) 8%
नक्त एन.पी.ए		0%	0%	0%
ऑडीट वर्ग		'A'	'A'	'A'
खेळते भांडवल		220,43,39,552	235,91,89,268	262,07,13,628

सभासद व भागभांडवल

कोणत्याही व्यवसायाची सक्षमता ही त्या व्यवसायातील भाग भांडवल व स्वनिधी यावर ठरविली जाते. बँकेकडे वर्षाच्या सुरवातीला एकूण 11794 एवढे भागधारक सभासद होते. त्यामध्ये 'अ' वर्ग सभासद 9795 व असोशिएट सभासद 1999 होते. विविध कारणाने 'अ' वर्ग सभासद 67 ने कमी झाले व नवीन 477 सभासद झाले. एकूण 'अ' वर्ग सभासद 10205 आहेत. असोशिएट 23 सभासद कमी झाले. एकूण असोशिएट सभासद 1976 आहेत. वर्ष अखेर 'अ' वर्ग व असोशिएट सभासद यांची एकत्रित संख्या 12181 इतकी आहे. अहवाल वर्ष अखेर भागभांडवल रु.273.65 लाख इतके आहे. बँकेच्या गतसालच्या तुलनेत त्यामध्ये 3.61 लाख वाढ झालेली आहे.

राखीव व इतर निधी

गतवर्षी बँकेकडे 6251.94 लाख स्वनिधी होता त्यामध्ये चालु वर्षी रु. 462.92 लाख इतकी भर पडली असून साल अखेर आपल्याकडे स्वनिधी रु. 6714.86 लाख इतका आहे. विविध स्वरुपाचे निधी व वसूल भागभांडवल म्हणजेच स्वनिधी वाढविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आला आहे. बँकेच्या स्थैर्याच्या व सक्षमतेच्या दृष्टीने स्वनिधी अत्यंत महत्वाचा असून बँकेची कर्ज वितरण क्षमता देखील स्वनिधीवर अवलंबून असते. भाग भांडवल व स्वनिधी हे बँकिंग व्यवसायाचा पाया असून त्यावरुनच व्यवसायाचे आर्थिक स्थैर्य समजून येते.

भांडवल पर्याप्तता

भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार (कॅपिटल ॲडीक्वसी) (CRAR) शेकडा किमान 9% असणे आवश्यक आहे. या अहवाल वर्षाअखेर आपल्या बँकेचे हे प्रमाण 30.27% इतके आहे. बँकेच्या सक्षमतेचे, सदृढतेचे व आर्थिक स्थैर्याचे हे द्योतक आहे.

ठेवी

कोविडमुळे मंदावलेले अर्थचक्र पुर्वपदाला येत असताना बँकेचा नफा स्थिर राखून व नियंत्रन संस्थेच्या विविध निर्देशांचे पालन करुन ठेव वाढविणे ही अत्यंत आव्हानात्मक कामगिरी होती. ही कमागिरी करत असताना समव्यावसायिक बँकांची स्पर्धा, बाजारातील स्पर्धा याचा अभ्यास करुन बँकेने नफा स्थिर राखण्यात यश मिळविलेले आहे. एकूण प्रगतीमध्ये ठेव वाढीला अनन्य साधारण महत्व आहे. आपल्या बँकेकडे वर्ष अखेर रु. 18176.90 लाख इतक्या ठेवी आहेत. ठेव वाढीमध्ये लो कॉस्ट व नो कॉस्ट ठेवी वाढविणे गरजेचे आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे आपल्या ठेवी डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटीज कार्पोरेशन स्कीम अंतर्गत सुरक्षित असून अद्यावत ठेव विमा उतरविलेला आहे.

कर्जे

कर्ज व्यवसायात वाढ करताना बँकेने नेहमीच बाजारातील परिस्थिती व ग्राहकांचा कल लक्षात घेऊन स्पर्धात्मक वातावरणामध्ये कायम टिकून राहण्यासाठी नवीन कर्ज योजना अंमलात आणल्या आहेत. बँकिंग व्यवसायात कर्ज व्यवहार हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. वर्ष अखेर 12804.57 लाख इतका कर्ज पुरवठा केलेला आहे. कर्ज पुरवठा करीत असताना बँकेने रिझर्व्ह बँकेकडून आलेल्या सुचना व धोरणांची अंमलबजावणी करून लहान व्यापारी, लघु उद्योग तसेच रिक्षा, माल वाहतुकीचे ट्रक, टेंपो, दुचाकी वाहने इत्यादी साठी आवश्यक कर्ज पुरवठा करून स्वयंरोजगार उपलब्ध करून दिलेला आहे.

ठेवीदारांचा पैसा कर्ज व्यवहारामध्ये गुंतविणे ही मोठी जोखीम असते. अर्थ व्यवस्थेतील अस्थिरता, आर्थिक मंदी तसेच आपण ठेवीदारांचे विश्वस्थ आहोत या भुमिकेतून कर्ज वितरण करताना आवश्यक ती काळजी घ्यावी लागते. कर्जाची व्यवहार्यता व उत्पादकता कायम राहण्यासाठी कर्ज मंजुरी पुर्वी कर्ज प्रकरणाची छाननी व कर्ज मंजुरीनंतर देखरेख (मॉनिटरिंग) वर अधिक भर देण्यात आलेला आहे. कर्ज वितरीत करीत असताना मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार अग्रक्रम क्षेत्रास व दुर्बल घटकांना करण्यात येणाऱ्या कर्ज वितरणाचे प्रमाण बँकेने राखले असून अग्रक्रम क्षेत्र कर्जाचे प्रमाण 8784.78 लाख, शेकडा प्रमाण 75.61% आहे व दुर्बल घटकास 5198.98 लाख कर्ज वितरण केले आहे, त्याचे शेकडा प्रमाण 44.75% आहे.

दि. 31 मार्च 2023 अखेर तुलनात्मक येणे कर्ज व थकबाकी खालीलप्रमाणे (आकडे लाखात)

		येणे कर्ज बाकी		पैकी थकबाकी	
		2022	2023	2022	2023
1	ओव्हर ड्राफ्ट कर्ज	514.05	489.44	4.22	6.44
2	कॅश क्रेडीट कर्ज	268.78	282.71	120.63	2312.95
3	सोने तारण कर्ज	4900.41	5198.98	715.88	526.76
4	सोने तारण (दोन लाखावर)	124.70	90.11	5.43	3.67

5	ठेव तारण कर्ज	118.59	149.52	--	4.42
6	हायपोथीकेश कर्ज	115.65	93.08	530.26	642.72
7	घर बांधणी कर्ज	176.83	144.32	49.52	61.48
8	सामान्य कर्ज	94.89	78.26	50.26	60.50
9	शैक्षणिक कर्ज	6.18	6.18	--	1.19
10	स्टाफ कर्ज	0.29	0.58	0	0
11	गव्ह. सेक्युरिटी कर्ज	3.40	3.89	--	0
12	बिल्स् परचेस्ड	6.81	6.81	6.81	6.81
13	बिल्स् डिस्काउंट	5.00	5.00	5.00	5.00
14	सी. आर. ई. कर्ज	247.70	256.59	4.72	6.24
15	स्टाफ वैयक्तिक कर्ज	116.49	107.14	0.09	0
16	घर बांधणी कर्ज EMI	1995.76	2254.16	5.09	8.26
17	सामान्य कर्ज EMI	1871.45	2155.92	8.46	22.44
18	हायपोथीकेशन (कार सोडून) EMI	886.87	1031.32	8.53	26.16
19.	हायपोथीकेशन (कार कर्ज) EMI	87.14	106.83	1.72	1.43
20	ओव्हर ड्राफ्ट कर्ज (मुदत ठेव तारण) EMI	4.72	21.63	--	0
21	हायपोथीकेशन कार कर्ज	1.80	0	0	0
22	हायपोथीकेशन दिवाळी धमाका	70.51	74.00	0.51	1.07
23	वैयक्तिक कर्ज	---	13.92	--	0.08
24	हायपोथीकेशन ॲटो कर्ज	---	234.18	--	2.63
		11618.02	12804.57	1517.13	3700.25

थकबाकी

अहवालसालात बँकेचे नक्त NPA प्रमाण 0% आहे आणि Gross NPA प्रमाण 4.08% आहे. थकबाकीच्या वसुलीकरिता बँकेचे संचालक मंडळ, सेल ऑफीसर व कर्मचारी यांच्यामार्फत कर्जदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधून प्रयत्न चालू आहेत.

कालनिहाय थकबाकीची स्थिती (आकडे लाखात)

तपशिल	थकबाकीदार	थकबाकी
1 वर्षाखालील	1924	2553.75
1 ते 2 वर्ष	8	7.84
2 ते 3 वर्ष	3	5.50
3 ते 4 वर्ष	2	4.87
4 ते 5 वर्ष	1	2.97
5 वर्षावरील	24	1125.32
एकूण	1962	3700.25

वरीलपैकी 20 थकबाकीदार कर्जदारावर दावे घातले असून त्यांच्याकडून 431.24 (व्याजासह) इतके येणे आहे. यापैकी ॲबिट्रेशन मध्ये 3 थकबाकीदाराकडून 32.56 लाख येणे आहे व 17 थकबाकीदारांच्यावर एक्झीक्युशन दावे असून 399.17 लाख येणे आहे.

बँक सुस्थितीत चालण्यासाठी कर्जाची कार्यक्षम वसुली होणे अत्यंत महत्वाचे आहे. व्यवसायामध्ये इतर व्यवसायाप्रमाणे काही धोके असतात, त्यापैकी प्रमुख धोका म्हणजे दिलेली कर्जे थकीत होऊन कालांतराने अनुत्पादित होणे व त्याच्या वसुलीबाबत साशंकता निर्माण होते. अनुत्पादित कर्जाची कार्यक्षम वसुली होणे अत्यंत महत्वाचे आहे. नवीन मंजूर केलेल्या कर्जावर काटेकोरपणे नियंत्रण प्रथमपासूनच ठेवण्यात येत आहे. सर्व थकीत कर्जदारांना नम्र विनंती आहे की, त्यांनी थकबाकीची रक्कम भरावी व बँकेला सहकार्य करावे.

गुंतवणूक :

बँकिंग क्षेत्रात गुंतवणूक हा देखील एक अविभाज्य व महत्वपूर्ण घटक आहे. कर्जासोबतच गुंतवणूक हा बँकेचा मुळ व्यवसाय आहे. बँकेकडे वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या निधीचा कर्जाकरिता उपयोग होईतोपर्यंत तो निधी सुरक्षित पर्यायामध्ये गुंतवणूक करुन बँकेला उत्पन्न मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य नियमित करण्यात येत आहे. बँकेची गुंतवणूक करताना रिझर्व्ह बँकेच्या निकषांचे पालन करुन बँकेने आपले

गुंतवणुकीबाबत धोरण तयार केले आहे. कमीत कमी जोखीम, चांगली तरलता आणि तुलनात्मक सुयोग्य परतावा या मुख्य निकषांवर आधारित आपले गुंतवणूकीचे निर्णय होत असतात. यानुसार वर्षभरातील गुंतवणूकीचे व्यवहार करण्याचा बँकेचा कटाक्ष असतो.

बँकेची गुंतवणूक पुर्णत्च सुरक्षित असून त्यापासून बॅकेला नियमित उत्पन्न मिळत आहे , हे विशेषत्वाने नमूद करण्यायोग्य आहे. अहवाल वर्ष अखेर एकूण गुंतवणूक रु. 11951.34 लाख आहे. सदर गुंतवणूक खालील बँकामध्ये केलेली आहे.

बी. डी. सी. सी. बँक	185.18	आय. डी. बी. आय. बँक	193.67	आय. डी.एफ.सी.फस्ट बँक	90.00
सरकारी कर्ज रोखे	8096.58	आय.सी.आय.सी.आय बँक	50.00	मुच्युअल फंड	1385.00
सुर्योदय स्मॉल फायनान्स बँक	468.16	जना स्मॉल फायनान्स बँक	400.00	इक्वीटास स्मॉल फायनान्स	300.00
बंधन बँक	679.66	बँक ऑफ इंडिया	102.59	इतर	0.50

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे मागणी व देयतेच्या 18% पर्यंत सरकारी रोख्यामध्ये गुंतवणूक करावी लागते. बँकेने 48.25% गुंतवणुक केलेली आहे.

विषय नं. 5 - सन् 2023-2024 सालाकरिता स्टॅट्यूटरी ऑडीटर नेमणूकीची शिफारस रिझर्व्ह बँकेला केली आहे. याची माहिती देणे.

रिझर्व्ह बॅक सर्क्युलय नं. DoS.CO.ARTG/SEC.01 / 08.91.001/2021-22 April 27,2021 Guidelines for Appointment of Statutory Central Auditors (SCAs) Statutory Auditors (SAs) of Commercial Banks, UCBs and NBCs (Re-appointment of Statutory Auditor) नुसार स्टॅट्यूटरी ऑडीटर नेमणूकी बाबत रिझर्व्ह बँकेला शिफारस केली आहे.

विषय नं. 7 - निव्वळ लाभाची विभागणी आणि राखीव निधी व इतर निधी निर्माण, अनुमोदन बाबत.

नफा विभागणी

अहवाल साली बँकेला निव्वळ नफा रु. 2,69,81,807.00 झालेला आहे. बँकेचे पोटनियम व सहकारी कायदा याला अनुसरुन खालीलप्रमाणे नफा विभागणी करावी अशी संचालक मंडळाने जनरल सभेला शिफारस केली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी.

1.	राखीव निधी		25%	रु. 6,745,452-00
2.	सहकारी शिक्षण निधी		2%	रु. 404,727-00
3.	को-ऑप. फेडरेशन सहकारी शिक्षण निधी		1%	रु. 202,364-00
4.	लाभांश	''अ वर्ग सभासद''	15%	रु. 3,782,940-00
		''असोशिएट सभासद''	8%	रु. 171,688-00
5.	सभासद कल्याण निधी		10%	रु. 1,962,927-00
6.	धर्मादाय फंड		2%	रु. 392,585-00
7.	बिल्डींग फंड		15%	रु. 2,944,390-00
8.	कर्मचारी कल्याण निधी		5%	रु. 981,463-00
9.	डिव्हीडंड इक्वलायझेशन फंड		10%	रु. 1,962,927-00
10.	ज्युबली फंड		10%	रु. 1,962,927-00
11.	सोशल वेलफअर फंड		10%	रु. 1,962,927-00
12.	Information Technology Fund			रु. 3,504,490-00
			एकूण	**रु. 26,981,807-00**

डिव्हीडंड (लाभांश)

भागाधारकांना योग्य परतावा देत असतानाच, नफ्याची पुर्नगुंतवणूक करुन समाधानकारक भांडवल पर्याप्तता प्रमाण राखण्याचे बँकेचे धोरण आहे. संचालक मंडळाने 'अ' वर्ग सभासद 15% व असोशिएट सभासद यांना 8% डिव्हीडंड देण्याची शिफारस केली आहे.

विषय नं. 8 - बँकेचे संचालक आणि त्यांच्या नातेवाईकानी घेतलेल्या कर्जाचे परिशिलन आणि थकबाकी असल्यास घेतलेल्या क्रमाबाबत विचार करणे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना कर्ज देता येत नाही, त्यामुळे बँकेने कर्ज पुरवठा केलेला नाही.

विषय नं.9 - बँकेचे सदस्य आणि संचालकानी बँकेची सेवा घेण्याबाबत चर्चा , परिशिलन.

सभासदांचे अधिकार व जबाबदाऱ्या - कर्नाटक को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट मध्ये झालेल्या दुरुस्तीप्रमाणे सभासदांचे अधिकार व जबाबदाऱ्या बाबत विवेचन केले आहे. जर एखादा सभासद बँकेच्या सुविधा खालील प्रमाणे घेत नसल्यास त्या सभासदाचे मतदानाबाबतचे अधिकार तीन वर्षाकरिता रहित होणार आहेत. शेवटच्या पाच जनरल सभापैकी किमान दोन जनरल सभेला हजर रहाणे, या व्यतिरिक्त बायलॉज नं. 20 अन्वये चारपैकी किमान दोन सेवा दरवर्षी बँकेकडून घेणे आवश्यक आहे. तरी सभासदांनी याची नोंद घ्यावी.

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेच्या संचालकानी काय करावे व काय करु नये याबद्दल बायलॉज मध्ये अमेंडमेंट केलेली आहे, त्याप्रमाणे संचालक सदर नियमांचे पालन करीत आहेत.

विषय नं.10 - नोकर नेमणूक, वेतन, आर्थिक सौलभ्य यांचे परिशिलन आणि आवश्यक क्रम.

गतवर्षी जनरल सभेत झालेल्या ठरावानुसार आर्थिक वर्षात नवीन नोकर भरती करण्यात आली आहे. मान. सहकारी खात्याकडून बँकेला एकूण 59 कर्मचाऱ्यांचा कॅडर स्ट्रेंथ मंजूर आहे. दि. 31 मार्च 2023 अखेर 49 कर्मचारी सेवेत आहेत. तसेच यावर्षी नवीन तीन शाखा उघडण्याकरिता परवानगी मिळाली आहे. त्यासाठी आपला कॅडर सेटअप वाढवावा लागणार आहे. यासाठी मा. सहकार खात्याची परवानगी घ्यावी लागते. मा.संचालक मंडळाने 4 शाखा मॅनेजर, 6 ऑफीसर, 2 टेक्नीकल, 5 क्लार्क व 5 शिपाई असा कॅडर सेटअप मंजूर करुन घेण्याबाबत सभेत ठराव मंजूर केला असून मा. जनरल सभेच्या मंजुरीसाठी शिफारस केली आहे.

विषय नं. 14 सहकारी कायदा 1959 कलम 27 (डी) प्रमाणे राहिलेले इतर विषय.

बँकेच्या व्यवहारासंबंधी चौकशी झाली असल्यास त्या बद्दलचा अहवाल. बँकेच्या व्यवहारात नुकसान झाले असल्यास त्या संबंधी पडताळणी करणे. इतर सहकारी संस्थामध्ये सदस्यत्व घेणे. बँकेची तपासणी झाली असल्यास त्या तपासणीचा अहवाल. बँकेचे विलिणीकरण, विभागणी, अवसायन या संबंधी चर्चा करणे. विविध निधींचा उपयोग संचालकाना दिलेले भत्ते यांचे परिशिलन करणे.

बँकेच्या व्यवहारासंबंधी आर्थिक वर्षात कोणत्याही तऱ्हेची चौकशी इलाख्याकडून झालेली नाही. बँकेच्या कोणत्याही व्यवहारात नुकसान ही झालेले नाही. चालू वर्षात बँकेने दुसऱ्या कोणत्याही सहकारी संघाचे सभासदत्व घेतलेले नाही. तसेच आर्थिक अहवाल वर्षात सहकार खात्याकडून बँकेची तपासणी झालेली नाही. बँकेचे आर्थिक व्यवहार व्यवस्थित चाललेले असल्यामुळे तसेच बँक सतत नफ्यामध्ये असल्यामुळे बँकेचे विलीनीकरण विभागणी अथवा अवसायन (liquidation) असा कोणताही विषय नाही. बँकेने निर्माण केलेले विविध निधी त्यांचा उपयोग सन 2022-23 या आर्थिक वर्षात केलेला नाही. बँकेच्या कामासाठी संचालकांनी केलेला प्रवास आणि इतर खर्चाचा तपशील नफा तोटा पत्रकामध्ये दिलेला आहे.

शाखा कामकाज

बँकेच्या शाखेच्या ठेवी, कर्जे, नफा व खेळते भांडवल या बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे. (आकडे लाखात)

31 मार्च 2023 अखेर	हेड ऑफिस	मुख्य शाखा	मार्केट यार्ड शाखा	खानापूर रोड शाखा	उद्यमबाग शाखा	नरगुंदकर भावे चौक शाखा	शहापूर शाखा	एकूण
ठेवी	-	11408.68	2080.75	1494.52	1106.96	892.14	1193.85	18176.90
कर्जे	-	8101.98	1258.02	1144.71	845.50	655.38	798.98	12804.57
नफा	-95.87	186.35	65.05	43.09	43.65	3.26	24.29	269.82
खेळते भांडवल	7090.43	11983.50	2213.38	1591.71	1176.42	909.34	1242.36	26207.14

सभासद कल्याण निधी

बँकेने सभासदाना यापुर्वी वयाची 60 वर्षे व सभासद होऊन 25 वर्षे पुर्ण झालेल्या सभासदांना वृध्दापकालीन सुविधा रु. 1000/- वितरण केले आहे. गतवर्षी त्यामध्ये बदल करुन वयाची 55 वर्षे सभासद होऊन 20 वर्षे झालेल्या सभासदाना रु. 2500/- वृध्दापकालीन सुविधा देण्यात येत आहे. या योजने अंतर्गत मागील काळात घेतले लाभ वजा करण्यात येत आहेत.

गतवर्षी बँकेचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला या निमित्ताने बँकेच्या सुरवाती पासून 2010 पर्यंतच्या सभासदांना रु. 500/- 2010 पासून 2015 पर्यंतच्या सभासदांना रु. 300/- व 2015 पासून 31 मार्च 2020 पर्यतच्या सभासदांना

रु.200/- चे बोनस शेअर देण्याचे संचालक मंडळाने जाहीर केले होते त्याचे वितरण चालु झाले आहे. के.वाय.सी देऊन आपले बोनस शेअर्स जमा करुन घ्यावे.

व्यवस्थापकीय संचालक मंडळ (BOARD OF MANAGEMENT)

रिझर्व्ह बँकेच्या दि. 31/12/2019 च्या मार्गदर्शक तत्वानुसार, बँकेने गतवर्षी व्यवस्थापकीय संचालक मंडळाची स्थापना केली आहे, या मंडळात एकूण 5 सदस्य आहेत, यापैकी 2 सदस्य विद्यमान संचालक मंडळातील असून संचालक श्री. बाळासाहेब काकतकर हे या व्यवस्थापकीय संचालक मंडळाचे चेअरमन आहेत व संचालक श्री. सुशिलकुमार खोकाटे हे सदस्य आहेत. अन्य तीन सदस्य हे बाहेरून स्विकृत केलेले आहेत. श्री. बी. बी. खंडागळे हे बँकीग तज्ञ आहेत, सौ. नयन मिरजकर या सी. ए. आहेत व श्री. जयराज मोदगेकर हे कायदे तज्ञ आहेत. सदर व्यवस्थापक मंडळ हे वेळोवेळी बँकेला सहकार्य व प्रोत्साहन देत आहे, त्यांचा मी आभारी आहे.

संगणकीकरण

बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा व आव्हाने लक्षात घेता ग्राहकांना अद्यावत तंत्रज्ञानाचा अधिकाअधिक वापर, वैविध्यपुर्ण व नाविन्यपूर्ण डिजीटल सेवा पुरविणे, ही काळाजी गरज आहे. डिजिटल आणि नवीन बँकिंग तंत्रज्ञान वेगाने विकसीत होत असून आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. कोवीड नंतर डिजीटल बँकिंगचे महत्व अनन्य साधारण झाले आहे. त्यामध्ये ATM, IMPS, UPI, ECOM, POSE, ECS, E-Statement, SMS, मोबाईल ॲप, नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) मार्फत या सुविधांचा समावेश आहे. कोअर बँकिंग प्रणालीमुळे ग्राहकांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करता येत आहेत. RTGS / NEFT, सेवा सुरु केल्या असून मुख्य शाखा, मार्केट यार्ड शाखा, खानापूर रोड शाखा व नरगुंदकर भावे चौक शाखेत स्वतःचे ATM मशीन सुरु केले आहे. (मार्केट यार्ड शाखेत रोख रक्कम भरणे मशीन बसविलेली आहे) तसेच एकाच ठिकाणी स्वयंचलीत पासबुक मशीन, ATM रोख भरणे आणि रोख काढणे (E-Loby) व आधारबेस ई-केवायसी सुविधा देण्याबाबत बँक प्रयत्नशील आहे. कोअर बँकिंग प्रणालीमुळे शासकिय अनुदान, पेन्शन इ. परस्पर आपल्या थेट खात्यावर जमा होत आहे.

तंत्रज्ञान व डिजीटलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात व्यवहार होत आहेत. यामुळे बँक व ग्राहक यांच्यातील आर्थिक व्यवहाराच्या सुरक्षेच्या दृष्टीने सायबर सिक्युरिटी हा कळीचा व काळजीचा मुद्दा बनलेला आहे. याबाबत रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार सायबर सिक्युरिटीची पुर्तता तसेच त्याचे दरवर्षी ऑडिट करण्यात येत आहे.

लेखापरिक्षण

बँकेचे सन 2022-23 चे शासकिय लेखापरिक्षण (वैधानिक अंकेक्षण) मे. व्ही. आय. कराडकर ॲण्ड कं. बेळगांव यानी केले असून आपल्या बँकेला 'अ' वर्ग दिलेला आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये अधिक पारदर्शकता यावी याकरिता अहवाल साली कंकरंट ऑडीट (सतत अंकेक्षण) मे. मराठे हारगुडे ॲण्ड कं, बेळगांव CA यांची नेमणूक केली होती. त्यानीही आपले ऑडीट रिपोर्टस दिलेले आहेत. ऑडीट कालावधीमध्ये त्यांनी बॅकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे, त्याबद्दल बॅक त्यांची आभारी आहे.

शाखा विस्तार

गेल्या काही वर्षापासून आम्ही शाखा विस्तार करण्याबाबत रिझर्व्ह बँकेकडे प्रयत्न करीत होतो. आत्ता आम्हाला नवीन तीन शाखा उघडण्याकरिता परवानगी मिळाली आहे. येत्या काही दिवसात लवकरच आम्ही गणेशपूर रोड, सांबरा रोड (एस. सी. मोटर्सच्या समोर) व खानापूर येथे (बस स्टॅण्ड जवळ) शाखा सुरु करीत आहोत.

सेवकवर्ग

बॅकेच्या प्रगतीत व कार्यात महत्वाचा वाटा सेवकांचा आहे. बदलत्या काळाच्या व व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन सेवकांच्या ज्ञान व कौशल्यात वाढ होण्यासाठी गरजेनुसार प्रशिक्षण दिले जाते, तसेच इतर प्रशिक्षण संस्थानी आयोजित केलेल्या प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात येते.

बॅक व्यवस्थापन व सेवक यांच्यातील संबंध सलोख्याचे, परस्पर सहकार्याचे राहिले पाहिजेत, याकरिता बँक सेवकांना वैद्यकिय भत्ता व विमा, नियमाप्रमाणे बोनस, उत्तेजनार्थ अंशदान, घर बांधणी, घर रिपेरी, घर खरेदी, वाहन खरेदी व वैयक्तिक कर्ज सवलतीच्या व्याजदरात देत आहे. तसेच बँकेत निटनेटकेपणा येण्यासाठी सेवकांना गणवेष देण्यात आला आहे.

श्रध्दांजली

अहवाल सालात दिवंगत झालेले ज्ञातअज्ञात सभासद, ग्राहक आणि हितचिंतक याना संचालक मंडळ व सभासदांच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

संचालक मंडळ व सब कमिटी सभा

अहवाल सालात संचालक मंडळ व सब कमिटीच्या एकूण 101 सभा झाल्या. सभांना सर्वसाधारणपणे सर्व संचालक उपस्थित असतात व सर्व निर्णय सार्वमताने घेतले जातात. संचालक मंडळ आपल्या खातेदारांचा बँकेवरील विश्वास वाढविण्याकरिता व्यावसायिक पध्दतीने कार्यरत असते. याशिवाय कार्यकारी सब कमिटी, कर्ज सब कमिटी, वसुली सब कमिटी व ऑडीट सब कमिटी वेळोवेळी नियमित आपल्या सभा घेऊन प्रदान केलेल्या अधिकार कक्षेत निर्णय घेत असतात. त्यानी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

आभार

बँकिंग व्यवसायाचे अविभाज्य भाग असलेले सर्व सन्माननिय सभासद, ग्राहक, ठेवीदार, कर्जदार, कर्मचारी व हितचिंतक यानी बँकेच्या कार्यक्षम वाटचालीत केलेल्या सहकार्याबद्दल व विश्वासाबद्दल संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ त्यांचे मनःपूर्वक आभार मानीत आहे. बँकेच्या दैनंदिन व्यवहारात वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करणारे अधिकारी, संस्था यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आमचे कर्तव्य आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सहकार ऑफीसीस, रजिस्ट्रार बेंगलोर, डायरेक्टर ऑफ ऑडीट बेंगलोर, जॉईंट रजिस्ट्रार, जॉईंट डायरेक्टर ऑफ ऑडीट, डेप्युटी रजिस्ट्रार, डेप्युटी डायरेक्टर ऑफ ऑडीट बेळगांव, असि. रजिस्ट्रार, कर्नाटक अर्बन बँक फेडरेशन बेंगलोर तसेच बँकेचे स्टॅच्युटरी ऑडीटर मे. व्ही. आय. कराडकर व त्यांचे सहकारी, कंकरंट ऑडीटर व टॅक्स ऑडीटर मे. मराठे हारगुडे ॲण्ड कं. व त्यांचे सहकारी, सेल ऑफीसर श्री. शंकर करबसण्णावर, ॲड. एस. आर. शिंदे, ॲड. चंद्रकांत गवले, ॲड. के. ए. साळवी, ॲड. प्रशांत कुलकर्णी, ॲड. ज्योती पाटील, ॲड मिनल मोदगेकर, इंजिनियर श्री. दीपक गायकवाड व सोने व्हॅल्युएटर श्री. विजय उदय तारळेकर, श्री. माणिक शिरोडकर या सर्वांचे मी आभार मानतो.

सरते शेवटी परंतू महत्वाचे असे पत्रकार, वृतपत्र प्रतिनिधी यानी बँकेचे कार्यवृत्त नेहमीच सकारात्मक व यथोचित सादर केले आहे. यामुळे जनसामान्यामध्ये बँकेबाबत जागरुकता निर्माण होऊन त्यांना बँकेच्या विविध उपक्रमांची माहिती मिळू शकली.

पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानून सर्वाना अंतःकरणपुर्वक धन्यवाद देतो व संचालक मंडळाच्या वतीने 81 वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, अंदाज पत्रक, नफा विभागणी आपल्यासमोर मंजुरीकरिता सादर करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी ही विनंती.

बेळगांव.
दि. 20/08/2023

आपला नम्र
श्री. दिगंबर पवार,
चेअरमन

❖ परिशिष्ट ❖

बँकेचे नांव	–	मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव.
मुख्य कार्यालयाचा पत्ता	–	1477, बसवाण गल्ली, बेळगांव, ता.जि.बेळगांव – 590 002
नोंदणी क्रमांक	–	8384 दि. 5-11-1942
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लायसन्स क्रं. व तारीख	–	UBDKA 776P 18-12-1986
बँकेचे कार्यक्षेत्र	–	बेळगांव व खानापूर तालुका

✻ तपशील ✻

मुख्य कार्यालयासह शाखा	–	1 + 6	ठेवीवरील खर्चाचा सरासरी दर	–	5.11%
सभासद	–	12181	व्याजापासुन मिळालेल्या उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	–	07.74%
भागभांडवल	–	273.66	निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण		01.03%
स्वनिधी	–	6714.86	घेतलेली कर्जे	–	--
ठेवी	–	18176.90	नेट एन.पी.ए	–	0%
कर्जे	–	12804.57	ग्रॉस एन. पी. ए.	–	4.08%
गुंतवणूक	–	11951.34	नफा	–	269.82
थकबाकी	–	3700.25	सेवक	–	49 (सेवक)
अग्रक्रम क्षेत्रास	–	8784.78 (75.61%)	खेळते भांडवल	–	26207.14
दुर्बल घटकास	–	5198.98 (44.75%)			

✻ वयाची 55 वर्षे व सभासद होऊन 20 वर्षे झालेल्या जेष्ठ सभासदाना बँकेच्यावतीने रु. 2500/- वृध्दापकालीन सुविधा देण्यात येत आहे. या योजने अंतर्गत मागील काळात बँकेकडून घेतलेले लाभ वजा करण्यात येतील.

✻ ज्या सभासदांचे शेअर्स रु. 1000/- पेक्षा कमी आहेत त्यांनी आपली शेअर्स रक्कम किमान 1000/- करावी अन्यथा कायद्यातील नवीन तरतुदीनुसार आपला मतदानाचा हक्क रद्द होऊ शकतो, तसेच ज्यांचे सेव्हिंगज नाही त्यांनी आपले के.वाय.सी. देऊन सेव्हिंग्ज खाते काढावे. त्यामुळे दरवर्षी आपला लाभांश (डिव्हीडंड) खात्यावर जमा होईल.

✻ सभासद व खातेदारानी कोणत्याही अनधिकृत मेल अथवा एस.एम.एस. ला उत्तर म्हणून आपल्या खात्याचा तपशील कळवू नये.

✻ आपला ग्राहक क्रमांक, एटीएम कार्ड क्रमांक, एटीएम पिन, सी.वी.वी क्रमांक, मोबाईल बँकिंग पासवर्ड, ओटीपी, पॅन क्रमांक, आधार क्रमांक, याचा कोणाकडेही खुलासा करु नका, बँक अशी माहिती कधीच विचारत नाही. कोणत्याही दुर्भावनायुक्त लिंकवर क्लिक करु नका.

PROFIT AND LOSS ACCOUNT FROM 01-04-2022 TO 31-03-2023 (FORM – B)

31-03-2022	EXPENDITURE	31-03-2023	31-03-2022	INCOME	31-03-2023
8,18,69,152-00	1. Interest on Deposit, Borrowings etc ठेवीवरील व्याज खर्च	8,54,32,066-40	18,29,98,337-93	1. Interest on Loans कर्जावरील व्याज 12,75,99,582-00 Interest On Investments गुंतवणुकीवरील व्याज 7,53,62,078-58	20,29,61,660-58
3,12,35,928-00	2. Salary & Allowances P.F. Fund, Bonus & Gratuity पगार भत्ते, प्रा. फंड, बोनस ग्रॅच्युटी	3,65,33,798-00			
3,59,400-00	3. Directors Fees, Local Committee Members Fees & allowances संचालक मिटिंग भत्ता	5,28,000-00	20,546-71	2. Commission कमीशन	7,236-48
37,08,328-16	4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. भाडे, टॅक्स, इन्शुरन्स वगैरे	36,70,576-57			
6,000-00	5. Law Charges न्यायालयीन खर्च	27,500-00	-----	3. Income from Non Banking Assets नॉन बँकींग व्यवहारातून मिळालेले उत्पन्न	-----
1,84,503-57	6. Postage, Telephone पोस्टेज , टेलिफोन	3,44,182-97	50,85,502-86	4. Miscellaneous Income इतर जमा (इतर जमाचा तपशील पुढील पानावर दिलेला आहे)	92,03,855-04
6,29,942-00	7. Audit Fee ऑडीट फी	7,65,000-00			
5,35,141-96	8. Printing Stationery & Advt. etc प्रिटिंग स्टेशनरी, जाहिरात	5,74,791-94	3,03,87,711-00	5. HO Interest Received	3,15,86,281-10
21,88,681-00	9. Depri. & Repairs to Banks Prop. बँकेच्या प्रॉपर्टीचा घसारा व दुरुस्ती	32,00,341-00			
150,56,914-96	10. Other Expenditures इतर खर्च (इतर खर्चाचा तपशील पुढील पानावर दिलेला आहे)	130,01,998-31			
120,20,674.00	11. Income Tax Provision इनकम टॅक्स तरतूद	140,38,914.00			
1,42,00,117-85	12. N. P. A. Provision & other Provision एन.पी.ए. व इतर तरतुद	2,70,73,775-91			
3,03,87,711-00	13. Branch Interest शाखा व्याज	3,15,86,281-10			
2,61,09,604-00	14. Balance of Profit निव्वळ नफा	2,69,81,807-00			
21,84,92,098.50	Total Rs.	24,37,59,033.20	21,84,92,098.50	Total Rs.	24,37,59,033.20

Sd/-
For V. I. Karhadkar & Co.
Chartered Accountant
Firm Registration No. 001744S

Sd/-
Sou. N. S. Kakatkar
Vice - Chairman

Sd/-
Shri. D. S. Pawar
Chairman

Sd/-
Shri. S. M. Dhamanekar
General Manager

MARATHA CO-OPERATIVE BALANCE SHEET AS ON

31-03-2022 Rs. Ps.	Capital & Liabilities भांडवल व देणी		31-3-2023 Rs. Ps.
5,00,00,000-00	1) Share Capital भागभांडवल		5,00,00,000-00
	Authorised Share Capital 5,00,000 Shares of Rs. 100/- each अधिकृत शेअर भांडवल		
	Called up Share Capital विक्री झालेले शेअर्स		
	2,73,657 Shares of Rs. 100/- each प्रत्येकी रु. 100/-		
	of held by		
2,70,04,900-00	i) Individual व्यक्तीगत/ वैयक्तिक		2,73,65,700-00
---	ii) Co-op. Institutions सहकारी संस्था		---
---	iii) State Government राज्य सरकार		---
---	iv) Nominal Membership Fee (B Class) नॉमिनल मेंबरशिप फी		---
62,51,94,479.66	2) Reserve Fund & Other Reserve : गंगाजळी व इतर निधी		67,14,86,169-87
	i) Statutory Reserve Fund स्टॅट्युटरी रिझर्व फंड	15,09,92,739-95	
	ii) Spl Provision for Housing / Industrial Loans स्पे. तरतुद / घर आणि औद्योगिक कर्ज	1,13,00,000-00	
	iii) Building Reserve Fund बिल्डींग रिझर्व्ह फंड	6,04,27,551-36	
	iv) Dividend Equalization Fund डिव्हीडंड इक्वलाझेशन फंड	2,33,68,321-22	
	v) Bad & Doubtful Debt. Reserve संशयित बुडीत कर्ज फंड	26, 76,81,501-18	
	vi) Contigent Provision against Std. Assets. स्टॅंडर्ड बुडीत कर्ज फंड	2,93,76,347-00	
	vii) Charity Fund धर्मादाय फंड	33,58,255.66	
	viii) Investment Flu. Fund इन्व्हे. फ्लक्च्यूएशन फंड	2,51,99,983-00	
	ix) Staff Welfare Fund स्टाफ वेलफेअर फंड	72,12,438-86	
	x) Jubilee Fund ज्युबिली फंड	1,62,59,939-31	
65,21,99,379.66	C/F		69,88,51,869.87

BANK LTD., BELGAUM
31st MARCH 2023 (Form "A" Third Schedule (Section 29)

31-03-2022 Rs. Ps.	Property & Assets जिंदगी व येणी		31-3-2023 Rs. Ps.
1,71,93,222-40	1) Cash in Hand & With Banks हातातील रोख रक्कम	190,43,562-55	1,97,63,001-55
	a) C. D. Balance with S.B.I., State Co-op. Bank and B.D.C.C. Bank चालू ठेव खात्यातील शिल्लक जिल्हा सहकारी बँक राज्य स. बँक	21,053-00 3,360-00 6,95,026-00	
1,85,18,387-00	b) Fixed deposit with Dist. Central Co-Op. Bank State Co-Op. Bank जिल्हा सहकारी बँक	--	1,85,18,387-00
25,76,45,365-25	2) Balance with other Banks इतर बँकेतील शिल्लक		29,77,67,941-17
	i) Current चालु ठेव	6,93,60,786.17	
---	ii) Fixed Deposits मुदत ठेव	22,84,07,155-00	---
---	3. Money at call & Short Notices मागणी करताच मिळणाऱ्या अल्प मुदतीच्या ठेवी		---
85,65,46,529-30	4. Investments गुंतवणुक		94,82,08,943-24
	a) In Central & State Govt. Securities & Treasury saving Certificates (Reserve Fund) मध्यवर्ती व राज्य सरकारचे कर्ज रोखे व सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् (रिझर्व्ह फंड)		
	i) Book Value	80,96,58,943-24	
	ii) Face Value	80,38,48,733-00	
	iii) Market Value	78,82,37,403-86	
	b) Shares in co-op. Institutions सहकारी संस्थांचे शेअर्स	50,000-00	
	c) Other Securities इतर शेअर्स		
	i) Book Value	13,85,00,000-00	
	ii) Face Value	13,85,00,000-00	
	iii) Market Value	13,85,00,000-00	
114,99,03,503.95	C/F		128,42,58,272-96

MARATHA CO-OPERATIVE BALANCE SHEET AS ON

31-03-2022 Rs. Ps.	Capital & Liabilities भांडवल व देणी		31-3-2023 Rs. Ps.
65,21,99,379.66	B/F		69,88,51,869.87
	xi) Member Welfare Fund / मेंबर वेलफेअर फंड	1,36,56,917-81	
	xii) Investment Deprication Fund गुंतवणूक घसारा फंड	2,90,04,007-00	
	xiii) Social Welfare Fund सोशल वेलफेअर फंड	1,46,84,884-54	
	xiv) Information Technology Fund माहिती तंत्रज्ञान फंड	1,61,72,459-98	
	xv) Staff and Directors Training Fund संचालक व स्टाफ प्रशिक्षण फंड	25,64,000-00	
	xvi) Nominal Membership Fee (B Class) नॉमिनल मेंबरशिप फी	2,26,823-00	
	3. Principal / Subsidiary State partnership fund account / सरकारी मदत / सहाय्य खाते		
161,10,65,918-42	4) Deposits & Other accounts : ठेवी व इतर खाती		181,76,89,719.05
	a) Fixed Deposits / मुदत ठेवी		
	i) Individuals / वैयक्तिक	104,70,32,365-00	
	ii) Other Societies / इ. सहकारी संस्था	25,14,02,364-00	---
		129,84,34,729-00	
	b) Saving Bank Deposits सेव्हिंगज बँक ठेवी		
	i) Individuals / वैयक्तिक	44,79,66,545.87	
	ii) Other Societies / इ. सहकारी संस्था	0	
	c) Current Deposits / चालू ठेवी	44,79,66,545.87	
	i) Individuals / वैयक्तिक	5,39,72,006-14	
	ii) Other Societies / इ. सहकारी संस्था	1,73,16,438.04	
	iii) Co-Op. Bank / इ. सहकारी संस्था	--	
		7,12,88,444-18	
	5. Borrowings / कर्जे		
	6. Bills for collection being Bills receivable as per contra वसुलीसाठी पाठविलेले चेक्स्, हुंड्या, बिले वैगेरे (कॉन्ट्रा)		
48,32,31,508-47	7. Branch Adjustment ब्रॅच ॲडजेस्टमेंटस		58,02,39,719-12
4,51,59,882-00	8. Interest Payable / व्याज देणे		4,68,00,479-00
279,16,56,688-55	C/F		314,35,81,787.04

BANK LTD., BELGAUM
31st MARCH 2023 (Form "A" Third Schedule (Section 29)

31-03-2022 Rs. Ps.	Property & Assets जिंदगी व येणी		31-3-2023 Rs. Ps.
114,99,03,503-95	B/F		128,42,58,272-96
	5) Out of the Principal Subsidiary State Partnership Fund Accounts सरकारी मदत सहाय्यातून शेअर्समध्ये गुंतवलेली रक्कम		
58,24,48,293-30	6. Advances कर्जे		60,94,68,590-58
	a) Short term cash credit overdraft Bills discounted अल्प मुदतीची कॅश क्रेडिट कर्जे / ओव्हर ड्राफ्टस व बिल्स् डिस्काऊंट	---	
	i) Govt. & other approved securities सरकारमान्य सेक्यूरिटीवर	--	
	ii) Other tangible securities / इतर तारणावर	60,82,87,652-58	
	iii) Surities / जामिनकीवर	--	
	iv) Personal Securities / वैयक्तिक जामिनकीवर	11,80,938-00	
	Overdues / थकबाकी	28,61,62,687-26	
33,73,24,495-00	b) Medium Term Loan मध्यम मुदतीची कर्जे		40,54,81,715-18
	i) Govt. & other approved securities सरकारमान्य सेक्यूरिटीवर	3,88,717-00	
	ii) Other tangible securities / इतर तारणावर	40,50,92,998-18	
	iii) Surities / जामिनकीवर	--	
	Overdues / थकबाकी	7,62,64,151-18	
24,20,29,078-00	c) Long Term Loan दीर्घ मुदतीची कर्जे		26,55,06,784.00
	i) Govt. & other approved securities सरकारमान्य सेक्यूरिटीवर	00	
	ii) Other tangible securities / इतर तारणावर	26,55,06,784.00	
	iii) Surities / जामिनकीवर	--	
	Overdues / थकबाकी	75,98,192-00	
---	7. Bills Recrivable being Bills for Collection as per Contra वसुलीसाठी पाठविलेले चेक्स्, हुंड्या (कॉन्ट्रा)		
48,22,84,068-47	8. Branch Adjustment / (ब्रॅंच ॲडजेस्टमेंट)		58,03,92,887-10
52,17,526-00	9. Building Premises / (इमारती)	52,17,526-00	61,16,151-00
	Add- Addition	15,78,197-00	
	Less Credit	--	
	Less Dep. / घसारा	6,79,572-00	
2,79,92,06,964.72	C/F		3,15,12,24,400.82

MARATHA CO-OPERATIVE BALANCE SHEET AS ON

31-03-2022 Rs. Ps.	Capital & Liabilities भांडवल व देणी		31-3-2023 Rs. Ps.
279,16,56,688-55	B/F		314,35,81,787.04
2,37,07,044-38	9. Other Liabilities / इतर देणी		3,05,42,921-21
	a) Dividend Payable डिव्हीडंड देणे	32,30,393-00	
	b) Other Payable इतर देणे	22,77,302-15	
	c) Sundries संन्ड्रीज	2,50,35,226-06	
26,70,02,102-00	10) Overdue N.P.A. Int. Receivable as per contra थकबाकी व्याज येणे तरतुद (कॉन्ट्रा)		28,31,89,288-00
2,61,09,604-00	11. Profit & Loss Account नफा तोटा		2,69,81,807-00
	Profit for year 2021-2022	2,61,09,604-00	
	Less Profit Appropriation	2,61,09,604-00	
	Add Profit for year 2022-2023	2,69,81,807-00	
50,47,191-43	12. Contingent Liabilities		1,61,28,216-89
	a) Bank Gurantees / बँक गॅरंटीज	3,81,395-00	
	b) Deaf Accounts	157,46,821-89	
311,35,22,630-36	C/F		350,04,24,020-14

ಲೆಕ್ಕ ಪರಿಶೋಧಕರ ಧೃಡಿಕರಣ ಪತ್ರ

(ಕರ್ನಾಟಕ ಸಹಕಾರ ಸಂಘಗಳ ಅಧಿನಿಯಮ 1959 ರ ಕಲಂ 63 (16) ರಂತೆ)

ನಾವು ಮೆ// ವ್ಹಿ. ಆಯ್. ಕರಾಡ್ಹಕರ ಮತ್ತು ಕಂಪನಿ ಈ ಮೂಲಕ ದೃಢೀಕರಿಸುವುದೇನೆಂದರೆ,

1) ನಮ್ಮ ತಿಳುವಳಿಕೆ, ಅಭಿಪ್ರಾಯ ಹಾಗೂ ಲೆಕ್ಕಪರಿಶೋಧನಾಕರ್ಯಕ್ಕೆ ನಮಗೆ ನೀಡಿದ ವಿವರಣೆಗಳಂತೆ, ಬ್ಯಾಂಕಿನ ಲೆಕ್ಕಪತ್ರಗಳು, ಆರ್ಥಿಕ ತಖ್ತೆಗಳು, ಅನುಸೂಚಿಗಳು ಕರ್ನಾಟಕ ಸಹಕಾರ ಸಂಘಗಳ ಅಧಿನಿಯಮ 1959 ಅಧಿನಿಯಮದಲ್ಲಿ ಅಗತ್ಯಪಡಿಸಿದ ರೀತಿಯಂತೆ ಮಾಹಿತಿ ನೀಡುತ್ತವೆ.

2) ದಿ. 31/03/2023 ರಂತ್ಯಕ್ಕೆ ಇದ್ದ ಅಢಾವೆ ಪತ್ರಿಕೆ ಹಾಗೂ ಸನ್ 2022–23ನೇ ಸಾಲಿನ ಲಾಭ ಹಾನಿ ಪತ್ರಿಕೆಯು ಬ್ಯಾಂಕಿನ ನಿಜವಾದ ಮತ್ತು ನ್ಯಾಯ ಸಮ್ಮತವಾದ ಆರ್ಥಿಕ ಸ್ಥಿತಿಮತ್ತು ಲಾಭ ಹಾನಿಯನ್ನು ಪ್ರತಿಬಿಂಬಿಸುತ್ತದೆ ಎಂದು ಅಭಿಪ್ರಾಯಪಡುತ್ತೇನೆ.

3) ನಮ್ಮ ಜ್ಞಾನ ಹಾಗೂ ನಂಬಿಕೆಯ ಪ್ರಕಾರ ಲೆಕ್ಕ ಪರಿಶೋಧನೆಗೆ ಅಗತ್ಯವಾದ ಮಾಹಿತಿ ಹಾಗೂ ವಿವರಣೆಗಳನ್ನು ಇವರಿಂದ ಪಡೆದಿರುತ್ತೇವೆ.

4) ಬ್ಯಾಂಕಿನ ಲೆಕ್ಕ ಪರಿಶೋಧನಾ ಕಾಲಕ್ಕೆ ಕಂಡುಬಂದಂತೆ ಬ್ಯಾಂಕಿನಲ್ಲಿ ಸರಿಯಾದ ಲೆಕ್ಕಪತ್ರಗಳನ್ನು ಇಡಲಾಗಿದೆ.

5) ವರದಿಗೆ ಲಗತ್ತಿಸಿದ ಅಢಾವೆ ಪತ್ರಿಕೆ ಹಾಗೂ ಇತರೆ ಆರ್ಥಿಕ ತಖ್ತೆಗಳು ಸಂಘದಲ್ಲಿ ನಿರ್ವಹಿಸಿದ ಲೆಕ್ಕಪತ್ರ ಪುಸ್ತಕಗಳಿಗೆ ತಾಳೆ ಇರುತ್ತವೆ.

ಶಾಸನಬದ್ಧ ಲೆಕ್ಕಪರಿಶೋಧಕರು

ಸ್ಥಳ : ಬೆಳಗಾವಿ

ದಿನಾಂಕ : 26–6–2023

ಯು.ಡಿ.ಆಯ್.ಎನ್ : 23220495BGXGJH8196

For M/s. V. I. Karhadkar & Co.
Chartered Accountant

CA. Ravindra V. Karhadkar (Partner)
M.No. : 220495, F.R.No.: 001744 S

BANK LTD., BELGAUM
31st MARCH 2023 (Form "A" Third Schedule (Section 29)

31-03-2022 Rs. Ps.	Property & Assets जिंदगी व येणी		31-3-2023 Rs. Ps.
2,79,92,06,964-72	B/F		3,15,12,24,400.82
32,95,783-00	10) Furniture & Fixtures / फर्निचर व फिक्चर्स	32,95,783-00	35,58,566.00
	Add - Addition	658,180-00	
	Less Dep वजा घसारा	3,95,397-00	
22,78,813-04	11) Computer / (संगणक)	22,78,813-04	35,51,206-67
	Add - Addition	26,73,418-63	
	Less Credit	0	
	Less Dep वजा घसारा	14,01,025-00	
14,82,845-74	12) Dead Stock (डेडस्टॉक)	14,82,845-74	13,61,292-18
	Add - Addition	29,708-44	
	Less Credit	0	
	Less Dep वजा घसारा	1,51,262-00	
7.499-00	13) Library (लायब्ररी)	7,499-00	9,765-00
	Add-Addition	3,351-00	
	Less Dep. वजा घसारा	1,085-00	
14,30,000-00	14) Solar Power Unit	14,30,000-00	8,58,000-00
	Add-Addition	0	
	Less Dep. वजा घसारा	5,72,000-00	
3,37,71,431-43	15) Other Assets इतर येणी		4,05,43,284-58
	1. Insurance Receivable	953059.00	
	2. Other Expenses Receivable	15691.00	
	3. Electric Meter Deposit Receivable	149334.00	
	4. Festival Advance Receivable	108000.00	
	5. Advance Receivable	2854583.00	
	6. Telephone Deposit Receivable	26000.00	
	7. Interest Receivable(Govt Securities)	9659751.25	
	8.Service Tax Receivable	15501.62	
	9.Interest on Investments Receivable	2267178.00	
	10.Adv Income Tax Receivable FY 2022-23.	13500000.00	
	11. TDS Receivable	366877.00	
	12. Bhadvar Bandhu CC Loan Int receivable	11905.00	
	13. Income Tax Receivable	2289135.00	
	14. GST	1255655.78	
	15. Other Receivables	3893392.51	
	16. Suspense Receivable	31100.00	
	17 Deffered Tax Asset	3146121.42	
26,70,02,102-00	16) Overdues NPA Int. Rec. as per Contra थकबाकी व्याज येथे तरतुद (कॉन्ट्रा)		28,31,89,288-00
50,47,191-43	17) Contingent Assets		1,61,28,216-89
	a) Bank Gurantees (बँक गॅरंटीज)	3,81,395-00	
	b) Deaf Receivable	1,57,46,821-89	
311,35,22,630-36			350,04,24,020-14

सही/-
श्री. संतोष एम. धामणेकर
जनरल मॅनेजर

